


# पारनेर दर्शन





वर्ष ३ अंक १०, गुरुवार २१ नोव्हेंबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# पारनेर-नगर मतदारसंघात सुमारे ७५ टक्के मतदान

## ■ गावागावांत चुरशीने परंतू शांततेत मतदान ■ काही ठिकाणी मतदान यंत्रात बिघाड







■ ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी राळेगणसिध्दीत मतदानाचा हक्क बजावला. ■ आदर्श गाव योजनेचे राज्याचे कार्याध्यक्ष पोपटराव पवार यांनी हिवरे बाजार येथे मतदानाचा हक्क बजावला. ■ खा. नीलेश लंके यांनी हंगे येथे मतदानाचा हक्क बजावला. ■ महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी लंके यांनी हंगे येथे मतदानाचा हक्क बजावला. ■ महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते यांनी पोखरी येथे सपत्नीक मतदानाचा हक्क बजावला.



■ अपक्ष उमेदवार संदेश कार्ले यांनी खंडाळा येथे मतदानाचा हक्क बजावला.

पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूकीसाठी अंदाजे ७५ टक्के मतदान झाले. बुधवारी सकाळपासूनच विशेषतः महाविकास आघाडी तसेच महायुतीच्या कार्यकर्त्यांनी मतदारांना मतदान केंद्रावर आणून मतदान घडवून आणण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा केली. दिवसभरात विविध गावांमध्ये चुरशीने मात्र शांततेत मतदान पार पडल्याचे वृत्त आहे. दरम्यान काही मतदान केंद्रावर मतदान यंत्रात बिघाड झाल्याने तेथील मतदान काही काळासाठी प्रभावीत झाले होते.**

या निवडणूकीमध्ये माघार झाल्यानंतर प्रत्यक्ष प्रचारास सुरूवात झाल्यानंतर सुरूवातीस अतिशय थंडा प्रतिसाद पहावयास मिळत होता. प्रमुख प्रतिस्पर्ध्यांपैकी महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी लंके यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल करताना मोठे शक्तीप्रदर्शन केले. सुमारे २५ ते ३० हजार महिलांच्या उपस्थितीत त्यांनी पारनेर शहराच्या बाजार तळावर सुप्रिया सुळे यांच्या उपस्थितीत त्यांनी सभा घेतली.

त्यानंतर मात्र त्यांनी मोठया नेत्यांच्या उपस्थितीत सभा घेण्याचे टाळले. दुसरीकडे लंके यांचे प्रतिस्पर्धी महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते यांनी प्रचाराचा नारळ फोडल्यानंतर प्रचाराच्या अखेरच्या टप्प्यात त्यांनी अजित पवार व धनंजय मुंडे यांच्या सभा घेत निवडणूकीत रंगत निर्माण केली.

### मतदारांना लक्ष्मीदर्शन

पारनेर तालुक्याच्या इतिहासात विधानसभा निवडणूकीत मतदारांना घसघशीत लक्ष्मीदर्शनाचा लाभ झाल्याची वंदता आहे. शेवटच्या दोन दिवसांत गावागावांमध्ये लक्ष्मीचे वितरण करण्यात येत होते. त्यामुळे मतदारांमध्येही आनंदाचे वातावरण दिसून येत होते.

### व्हीव्हीपॅटमध्ये तांत्रिक बिघाड

मतदान सुरू झाल्यानंतर मतदान प्रक्रियेदरम्यान बुथ क्र. १०६ नवनागापुर, २३४ लोणीमावळा या बुथवर तांत्रिक बिघाड झाल्याने व्हीव्हीपॅट मशिन बदलण्यात आल्याचे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कार्यालयाकडून सांगण्यात आले.

### सकाळी ७ ते ९ दरम्यान ४. ४५ टक्के

सकाळी सात ते नऊच्या दरम्यान १५ हजार ५७६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. त्यात ११ हजार ५३४ पुरूष तर ४ हजार ४२ महिलांचा समावेश होता. सकाळी मतदान संथ गतीने सुरू असल्याने दोन तासात केवळ ४.४५ टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.

### ११ वाजेपर्यंत १७.४२ टक्के मतदान

सकाळी नऊ नंतर मतदान केंद्रांवर मतदारांची वर्दळ वाढण्यास सुरूवात झाली. त्यामुळे सकाळी ११ वाजेपर्यंत ६१ हजार २८ मतदारांनी १७.४२ टक्के मतदानाचा हक्क बजावला. त्यात ३७ हजार ३३४ पुरूष तर २३ हजार ६९४ महिलांचा समावेश होता.

### दुपारी तीन पर्यंत जिल्हयात सरासरी ४७.८५ टक्के

दुपारी तीन वाजेपर्यंत नगर जिल्हयातील विविध विधानसभा मतदारसंघात सरासरी ४७.८५ टक्के इतके मतदान पार पडले होते. त्यात नेवासे मतदार संघात सर्वाधिक ५४.७४ तर सर्वात कमी मतदान श्रीगोंदे मतदारसंघात ४०.१३ टक्के इतके झाले होते. अकोल्यात ५३.१९ , संगमनेर ५०.६० शिर्डी ५३. ८७ , कोपरगांव ५२.३९, श्रीरामपुर ४२.३२, नेवासा ५४.७४, शेवगांव ४२.६३, राहुरी ४५.९० , पारनेर ४६.९१४६, नगर शहर ४४.१७, श्रीगोंदे ४०.१३, कर्जत-जामखेड ५१.१६ अशी मतदानाची टक्केवारी होती अशी माहीती जिल्हा माहीती कार्यालयाकडून देण्यात आली.

### व्ही व्ही पॅट, बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट बदलले

मॉक पोल दरम्यान तफावत आढल्याने बुथ क्र.२१२ चास, १७४ सोबलेवाडी, १७८ जामगांव, २९२ रायतळे, ६ देसवडे, येथील व्ही व्ही पॅट युनिट बदलण्यात आले तर बुथ क्र.३३८ घोसपुरी येथील बॅलेट युनिट तसेच बुथ क्र. १७६ करंदी, १५१ वेसदरे येथील कंट्रोल युनिट बदण्यात आल्याचे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कार्यालयाकडून सांगण्यात आले.

### मुंबईकर मोठया संख्येने दाखल

नोकरी, व्यवसायानिमित्त मुंबईसह राज्याच्या विविध भागात वास्तव्य करणाऱ्या पारनेरकरांनी बुधवारी मतदानासाठी मोठया संख्येने आपल्या गावाकडे मतदानासाठी हजेरी लावली होती. उमेदवारांनी त्यांच्यासाठी खास वाहनांची, प्रवासादरम्यान चहा, पाणी, नास्ता जेवणाचीही व्यवस्था करण्यात आली होती. आजवर पार पडलेल्या निवडणूकांच्या तुलनेत या निवडणूकीत मतदानासाठी परगावांवरून बोलविण्यात आलेल्या मतदारांची संख्या लक्षणीय होती.

### दुपारी १ वाजेपर्यंत ३२.९० टक्के

सकाळी ११ नंतर मतदानाचा वेग आणखी वाढून दुपारी १ वाजेपर्यंत १ लाख १५ हजार २७५ मतदारांनी ३२.९० टक्के मतदानाचा हक्क बजावला होता. त्यात ६३ हजार ६४७ ६ पुरूष तर ५१ हजार ६२८ महिलांचा समावेश होता.

### ५ वाजेपर्यंत जिल्हयात ६१.९५ टक्के

सायंकाळी ५ वाजेपर्यंत जिल्हयात सरासरी ६१.९५ टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. त्यात अकोले ६६.१६, संगमनेर ६४.१३, शिर्डी ६४.७७, कोपरगांव ६५.८०, श्रीरामपुर ५८.४२, नेवासे ७०.४९, शेवगांव ५६.०५ , राहुरी ६१.४०, पारनेर ६१.१९ , नगर शहर ५६.४३, श्रीगोंदे ५५.४८, कर्जत जामखेड ६६.५० यांचा समावेश असल्याचे जिल्हा माहीती कार्यालयाकडून सांगण्यात आले.

### अण्णा हजारे यांनी बजावला मतदानाचा हक्क

ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी राळेगणसिध्दीच्या जिल्हा परिषद शाळेत जात मतदानाचा हक्क बजावला. एकही उमेदवार पसंत नसल्यास नकाराधिकाराचे नोटा बटन तसेच बॅलेट युनिटवर उमेदवाराचे छायाचित्र हवे याचा आग्रह धरून दोन्ही मागण्यांची अंमलबजावणी करायला भाग पाडणाऱ्या हजारे यांनी कोणाला पसंती दिली ? की नकाराधिकार वापरला ? याची उत्सुकता असून ती कायमच राहणार आहे !

### लंके दाम्पत्याने बजावला मतदानाचा अधिकार

नगर दक्षिणचे खासदार नीलेश लंके व त्यांच्या पत्नी महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी लंके यांनी हंगे येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत स्वतंत्रपणे मतदानाचा हक्क बजावला. खा. लंके व उमेदवार राणी लंके यांनी या निवडणूकीत महाविकास आघाडी सहज विजय संपादन करेल असा विश्वास व्यक्त केला.

### तीन वाजेपर्यंत ४६.९१ टक्के

दुपारी एक वाजेनंतर शिघ्र गतीने मतदानास प्रारंभ झाला. विशेषत: दुपारच्या सत्रात महिला मतदार मोठया संख्येने बाहेर पडल्याचे सर्वच बुथवरचे चित्र होते. तीन वाजेपर्यंत १ लाख ६४ हजार ३३३ मतदारांनी ४६.९१ टक्के मतदानाचा हक्क बजावला. त्यात ८६ हजार ६२३ पुरूष तर ७७ हजार ७१० महिलांचा समावेश होता.

### कार्यकर्त्यांच्या पैजा, नवस आणि फटाक्यांची आतिषबाजीही

शांततेत प्रचार पार पडल्यानंतर महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी लंके व महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते या प्रमुख उमेदवारांच्या कार्यकर्त्यांनी मतदानाच्या दिवशी अतिशय चुरशीने मतदान घडवून आणले. मतदानानंतर दोन्ही समर्थकांमध्ये लाखो रूपयांच्या पैजा लागल्या आहेत. अनेक कार्यकर्त्यांनी आपल्या उमेदवाराच्या विजयासाठी नवस केले असून काही अतिउत्साही कार्यकर्त्यांनी मतदानानंतर फटाक्यांची आतिषबाजी करत अतिआत्मविश्वासाचे प्रदर्शन घडविले.

### संदेश कार्ले यांचे खंडाळयात मतदान

शिवसेनेचे बंडखोर अपक्ष उमेदवार संदेश कार्ले यांनी नगर तालुक्यातील त्यांच्या खंडाळा या गावी आपल्या सहकाऱ्यांसह मतदानाचा हक्क बजावला. चांगले काम करू या, आपला माणूस आपल्यासाठी निवडूण देऊ या असा संदेश यावेळी कार्ले यांनी मतदारांना दिला.

### दुपारनंतर महिला मतदारांच्या रांगा

दुपारी एक वाजेपर्यंत महिला मतदारांचे मतदान अतिशय संथ गतीने सुरू होते. एक वाजेनंतर मोठया संख्येने महिला घराबाहेर पडल्या. महिलांच्या मोठया संख्येने विविध मतदान केंद्रांवर महिलांच्या मतदानासाठी रांगा लागल्याचे चित्र पहावयास मिळाले.

**लंके, दाते यांचेच बुथ –** पारनेर तालुक्यातील विविध गावांना भेटी दिल्या असता महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी लंके व महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते या दोनच उमेदवारांचे बुथ मतदान केंद्राबाहेर दिसून आले. उर्वरीत उमेदवारांचे बुथ अथवा कार्यकर्तेही दिसून आले नाहीत.

### काशिनाथ दाते यांनी पत्नीसह मतदानाला

महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते यांनी आपल्या पत्नीसह बुधवारी दुपारी पोखरी येथील मतदान केंद्रावर मतदानाचा हक्क बजावला. दाते यांनी मतदानास सुरूवात झाल्यानंतर विविध मतदान केंद्रांना भेटी देत मतदानाची माहीती घेतली. त्यानंतर दुपारी पोखरी येथे जात त्यांनी पत्नीसह मतदानाचा हक्क बजावला.

### ५ वाजेपर्यंत ६१.१९ टक्के

दुपारी ३ ते ५ वाजेपर्यंत चुरशीने मतदान झाले. ५ वाजेपर्यंत २ लाख १४ हजार ३९४ मतदारांनी ६१.१९ टक्के मतदानाचा हक्क बजावला. त्यात १ लाख ११ हजार ६८२ पुरूष तर १ लाख २ हजार ७१२ महिलांचा समावेश होता.

**कार्यकर्त्यांसाठी अल्पोपहाराची व्यवस्था** – मतदान केंद्राबाहेर मतदारांना मदतीसाठी उभारण्यात आलेल्या बुथवरील कार्यकर्त्यांसाठी दोन्ही उमेदवारांकडून दिवसभर अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली होती. मतदानासाठी आलेल्या मतदारांनाही अल्पोपहार देण्यात येत होता.

**एक्झिट पोलकडे लक्ष** –
मतदान संपल्यानंतर अनेक कार्यकर्त्यांनी दुरचित्रवाणी संचापुढे बसून एक्झिट पोलचा काय कल आहे याचा अंदाज घेणे पसंत केले. विविध एक्झिट पोलचे अंदाज परस्परविरोधी असल्याने कार्यकर्ते संभ्रमात दिसून येत होते. काटे की टक्कर असल्याचेही सांगितले जात असल्याने आपल्या विचारांचे सरकार राज्यात सत्तेवर येणार किंवा नाही या चिंतेने कार्यकर्त्यांना ग्रासल्याचेही पहावयास मिळाले.

### कोणत्या गावात किती मतदान ?

हाती आलेल्या आकडेवारीनुसार रांधे २३०८ पैकी १५१८, ६५.७७ , कडूस १२५४ पैकी १००८, जवळा ५००१ पैकी ३५२७ ,अक्कलवाडी ६८४ पैकी ४२१,६१.५४ , वासुंदे ३८३४ पैकी २६७९,६८ टक्के, खारेकर्जुने २९०० पैकी २०९५, सुपा ५१५०पैकी ३६७१, पळशी ३९७२ पैकी २७९६, ७०.३९टक्के, कान्हूरपठार ४९०० पैकी ३२१३, कडूस १२५४ पैकी १००८, दैठणेगुंजाळ २३३८ पैकी १५२४, गारखिंडी १०५० पैकी ७२२ ,६८.७६ ७२२, राळेगणसिध्दी २१२१ पैकी १५९७ , अळकुटी ३८५४ पैकी २६८६ ,६९.६९ टक्के, निघोज ११ हजार २५ पैकी ८ हजार ७३, ७३.२२ टक्के, पिंपळगांवरोठा २५७९ पैकी १५७८, ६१.१८ टक्के, कुरुंद १६७२ पैकी ११३२ ,६८ टक्के. डिकसळ १२१४ पैकी ७६५, ६३ टक्के, वडनेर बुद्रुक २६३८ पैकी २०४२ , ७७.४० २०४२ , हिवरे कोरडा १७८५ पैकी १३५१ , ७५.६८ टक्के, पिंपरीजलसेन १७०० पैकी ११४०. भोरवाडी १९९२ पैकी १२४१, वारणवाडी ६११ ६११ पैकी ४८९ .

# प्रगतीमंत्र

## नोकरी सोडताय? 'या' गोष्टी लक्षात घ्याच!

**नोकरी हा आपल्या प्रत्येकाच्याच आयुष्याचा एक महत्वाचा घटक झाला आहे. प्रत्येकापुढेच आर्थिक चिंता असल्याने अनेकदा भावनेला आणि आवडीला मुरड घालून एखादे क्षेत्र किंवा नोकरी निवडावी लागते. अशावेळी काही वर्षातच त्या नोकरीला आपण कंटाळतो किंवा ते क्षेत्र नकोसे वाटायला लागते आणि मग एकच पर्याय समोर येतो, ते म्हणजे नोकरी सोडून दुसरे क्षेत्र निवडणे.**



केवळ नावडीचे क्षेत्र निवडले म्हणूनच नाही तर कधीतरी आवडीच्या क्षेत्रातही फारशी प्रगती होत नाही. कित्येक वर्षे एकाच जागी टिकूनही ना आर्थिक वृद्धी होते ना पदोन्नती. त्यामुळेही बऱ्याचदा आपल्याला क्षेत्र बदलावे लागते. पण नोकरी सोडणे असो किंवा क्षेत्र बदलणे, हे दोन्ही तसे जिखिरीचेच मानले जाते. कारण यामध्ये आर्थिक आव्हाने आहेत, शिवाय पुढे निवडलेल्या क्षेत्राविषयीही अनिश्चितता असू शकते. त्यामळे आयुष्यातला हा महत्वाचा निर्णय घेण्याआधी या पाच गोष्टी करणे अत्यंत गरजेचे आहे. ज्यामुळे तुम्हाला नोकरी सोडल्यानंतर किंवा दुसरे करियर निवडल्या नंतर कधी पश्चाताप होणार नाही.

### आपल्या नाराजीचे कारण शोधा

एखादी नोकरी करावीशी वाटत नाही यामागे काय कारणे आहेत याचा शोध घ्या. नेमका आपला कामातील रस का निघून गेला यावर विचार करा. आपल्या स्वभावामुळे आपण तिथे जुळवून घ्यायला कमी पडतो आहोत का हेही पाहायला हवे. वरिष्ठांचा त्रास होत असेल तर तो का होतोय, आपलेही काही चुकते आहे का याचे आत्मपरीक्षण करायला हवे. जर आपला स्वभाव आड येत असेल किंवा आपल्याकडून काही चुका होत असतील तर त्यावर काम करणे, स्वतःमध्ये बदल करणे गरजेचे आहे. जर ते करूनही काही प्रगती होत नसेल किंवा त्याव्यतिरिक काही कारणे तर मग नक्कीच क्षेत्र बदलण्याचा विचार करा.




### योग्य शोध योग्य संधी

जर क्षेत्र बदलायचे असले तर स्वतःबाबत तटस्थ आणि व्यवहारी असणे गरजेचे आहे. ज्या क्षेत्रात आपण जात आहोत तिथल्या मर्यादा, उणिवा आणि आव्हाने याची आपल्याला जाणीव असायला हवी. शिवाय त्यासाठीची मानसिक तयारी आणि आलेल्या अडचणीवर मात करण्याची क्षमता आपल्याकडे हवी. सर्वात महत्वाचे म्हणजे आपली पूर्वतयारी जोरदार असायला हवी. म्हणजे ज्या क्षेत्रात जातो आहोत तिथे आवश्यक असणारे कौशल्ये, क्षमता, तंत्रज्ञान, विशिष्ट प्रणाली याबाबत आपण अद्ययावत आणि पारंगत असणे आवश्यक आहे. तसे नसल्यास त्यासाठी आवश्यक कोर्सेस, कोचिंग, प्रशिक्षण घेऊन ते अंगीभूत करावे. जेणेकरून तुम्हाला कोणत्याही अडचणी येणार नाहीत.

### सारासार विचार

बऱ्याचदा एखादी नोकरी सोडून आपण दुसऱ्या ठिकाणी गेलो कि तिथे काही काळ रमतो, पण एका विशिष्ट वेळेनंतर ती नोकरीही आपल्याला नकोशी वाटायला लागते. त्याही कामाचा कंटाळा येऊ लागतो किंवा तिथेही आपली चिडचिड होते. त्यामुळे नोकरी सोडताना आणि दुसरी नोकरी स्वीकारताना सारासार विचार करणे गरजचे आहे. पुन्हा तीच फरपट होणार असेल तर नोकरी सोडण्यापूर्वी पुनर्विचार करावा. किंवा असे क्षेत्र निवडावे जिथे पूर्वी झालेल्या गोष्टी टाळता येतील किंवा स्वीकारलेल्या कामाचा, तिथल्या जागेचा आपल्याला त्रास होणार नाही.

### स्वतःला प्राधान्य द्या

नवे क्षेत्र निवडण्यापूर्वी आधी स्वतःला प्राधान्य द्या. पहिला अनुभव फारसा बरा नसेल तर आता क्षेत्र बदलताना तुमचा स्वभाव, गरजा, मानसिकता पाहून नोकरी शोधा. शिवाय नोकरीसाठी होणार प्रवास,तुमच्या कौटुंबिक अडचणी याचीही दखल घ्या. ज्या क्षेत्राची तुम्हाला आवड आहे, ज्यामध्ये तुम्ही पारंगत आहात आणि विशेष म्हणजे ज्या क्षेत्रात तुम्ही कोणतेही आव्हान पेलू शकता असेच क्षेत्र निवडणे गरजेचे आहे.



# 'एमपीएससी' म्हणजे नेमके काय?

**एमपीएससी, यूपीएससी हे शब्द काही आता अपरिचित राहिलेले नाहीत. कारण प्रत्येक घरात असा एकतरी व्यक्ती असतो ज्याला या स्पर्धा परीक्षांचे वेड असते. पण बऱ्याचदा अनेकांना या दोन्ही परीक्षांमधील फरक समजत नाही. म्हणून आज विस्ताराने जाणून घेऊया 'एमपीएससी' म्हणजे काय ?**



हल्ली स्पर्धा परीक्षांचे वेड बरेच वाढले आहे. स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून शासकीय सेवेतील मोठी पदे मिळवण्यासाठी विद्यार्थी शाळेपासूनच या परीक्षांच्या अभ्यासाला लागतात . यामध्ये विद्यार्थी प्रामुख्याने यूपीएससी, एमपीएससी चा अभ्यास करताना दिसतात. ज्यांना देशभरात कुठेही पोस्टिंग चालणार असेल ते यूपीएससीचे ध्येय घेतात तर ज्यांना केवळ महाराष्ट्ररात राहून आपल्या राज्यासाठी काम करायचे असते ते एमपीएससी परीक्षेत झोकून देतात. पण ही 'एमपीएससी' परीक्षा नेमकी आहे काय.. हे जाणून घेऊया...

एमपीएससी ( MPSC )चा फुल फॉर्म आहे Maharashtra Public Service Commission म्हणजे 'महाराष्ट्र लोकसेवा आयोग'. या आयोगा मार्फत जी परीक्षा घेतली जाते तिला एमपीएससी परीक्षा म्हणतात. 'महाराष्ट्र लोकसेवा आयोग' ही भारतीय राज्यघटनेने कलम ३१५ अन्वये निर्माण केलेली सरकारी संस्था आहे. जी महाराष्ट्र राज्यातील नागरी सेवेतील अधिकारी पदांच्या भरतीसाठी परीक्षेचे आयोजन करते. त्यानंतर उमेदवारांची गुणवत्ता आणि राज्याच्या आरक्षणाच्या पूर्व-निर्धारित नियमांच्या आधारे या पदांची भरती केली जाते.

### एमपीएससी परीक्षेचा अभ्यासक्रम कसा असतो...


'एमपीएससी' परीक्षेचे दोन टप्पे असतात एक पूर्वपरीक्षा आणि दुसरी मुख्य परीक्षा. पूर्वपरीक्षेत उत्तीर्ण झालेला उमेदवारच मुख्य परीक्षेसाठी पात्र ठरतो. पूर्वपरीक्षेत सामान्य ज्ञान, सामान्य इंग्रजी, सामान्य मराठी आणि सामान्य अध्ययन यावर आधारित चार पेपर असतात. त्यानंतर परीक्षेत सहा पेपर असतात. ज्यामध्ये दोन भाषेचे पेपर (इंग्रजी आणि मराठी) आणि चार पेपर सामान्य अध्ययनाचे असतात. ज्यामध्ये इतिहास आणि भूगोल (महाराष्ट्राच्या संदर्भात), भारतीय संविधान आणि राजकारण, मानव संसाधन विकास आणि मानवी हक्क, अर्थव्यवस्था आणि नियोजन, विकास आणि कृषी आणि विज्ञान आणि तंत्रज्ञान विकासाचे अर्थशास्त्र असे विषय असतात.

### महाराष्ट्र लोकसेवा आयोगा अंतर्गत या पदांसाठी परीक्षा घेतल्या जातात...

- राज्यसेवा परीक्षा
- महाराष्ट्र वनसेवा परीक्षा
- महाराष्ट्र कृषी सेवा परीक्षा
- महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा गट अ परीक्षा
- महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा गट ब परीक्षा
- दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्याय दंडाधिकारी, प्रथम वर्ग परीक्षा
- साहाय्यक मोटर वाहन निरीक्षक परीक्षा
- पोलीस उपनिरीक्षक परीक्षा
- विक्रीकर निरीक्षक परीक्षा
- साहाय्यक परीक्षा
- लिपिक-टंकलेखक परीक्षा
- राज्यसेवा परीक्षेच्या माध्यमातून राज्य शासनाच्या सेवेतील, राजपत्रित गट 'अ' व गट 'ब' संवर्गातील खालील विविध पदांसाठी एकच परीक्षा घेतली जाते. ज्यामध्ये पूर्वपरीक्षा, मुख्य परीक्षा व मुलाखत या संपूर्ण प्रक्रियेमधून उत्तीर्ण झालेल्या उमेदवाराची निवड केली जाते.

### राज्यसेवा गट अ आणि ब च्या अंतर्गत येणारी पदे...

- उपजिल्हाधिकारी (गट अ)
- पोलीस उपअधीक्षक/सहाय्यक पोलीस आयुक्त (गट अ)
- सहाय्यक विक्रीकर आयुक्त (गट अ)
- उपनिबंधक, सहकारी संस्था (गट अ)
- उपमुख्य कार्यकारी अधिकारी/गटविकास अधिकारी (गट अ)
- महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा (गट अ)
- मुख्याधिकारी, नगरपालिका/परिषद, गट अ
- अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क (गट अ)
- तहसीलदार (गट अ)
- सहायक, प्रादेशिक परिवहन अधिकारी, (गट ब)
- महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा (गट ब)
- कक्ष अधिकारी (गट ब)
- गटविकास अधिकारी (गट ब)
- मुख्याधिकारी, नगरपालिका/नगर परिषद, (गट ब)
- सहायक निबंधक सहकारी संस्था (गट ब)
- उपअधीक्षक, भूमी अभिलेख (गट ब)
- सहायक आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, (गट ब)
- नायब तहसीलदार (गट ब)




# स्पर्धा परीक्षा देताय ? आवर्जून करा 'या' गोष्टी..

**यूपीएससी, एमपीएससी सारख्या परीक्षांमुळे स्पर्धा परीक्षांचे प्रचंड वेड तरुणांमध्ये दिसून येते. अगदी आठवी- दहावी पासूनच विद्यार्थी या परीक्षेचे प्राथमिक धडे गिरवताना दिसत आहेत. शासकीय सेवेत उच्च पदस्थ अधिकारी होण्याचे ध्येय उराशी बाळगणारे आज लाखो तरुण आपल्या आजूबाजूला आहेत. जिद्द, चिकाटी आणि दिवसरात्र अभ्यास करून ते या परीक्षेची तयारी करत आहेत. त्याच परीक्षेसाठी काही महत्वाच्या टिप्स आपण पाहूया**

- या स्पर्धा परीक्षांचा पाया आहे ते म्हणजे 'सामान्य ज्ञान'. ज्याला इंग्रजी मध्ये आपण जनरल नॉलेज म्हणतो. या परीक्षांमधील मोठा भाग हा सामान्य ज्ञानावर आधारित असतो. मग अशावेळी विद्यार्थी सामान्य ज्ञानाची पुस्तके वाचतात, शिकवण्या लावतात. पण सामान्य ज्ञान हे दैनंदीन जीवनातही वाढायला हवे आणि ते सहजही वाढवता येते, त्यासाठी खाली दिलेल्या गोष्टी आवर्जून करा..
- इंग्रजी वृत्त वाहिनी आणि वृत्त पत्रांचे वाचन : स्पर्धा परीक्षांसाठी सामान्य ज्ञान वाढवायचे असेल तर आपल्याला इंग्रजीची उत्तम समज असणे गरजेचे आहे. तसेच दिवसाची सुरवात ही इंग्रजी वृत्तपत्र वाचून करावी आणि दिवसातून किमान एकदा तरी इंग्रजी वृत्त वाहिनीवरील बातम्या पाहाव्यात. जेणेकरून राष्ट्रीय घडामोडीसोबत आंतरराष्ट्रीय घडामोडीही आपल्याला समजतील. जे सामान्य ज्ञानात महत्वाचे आहे.
- मनोरंजनाचे ज्ञानात रूपांतर : आपल्याकडे मनोरंजनाचे सर्वात सक्षम साधान म्हणजे चित्रपट, माहितीपट आणि लघुपट. आज राज्यासह, देश आणि आंतराष्ट्रीय पातळीवरील घटनांचा आढावा घेणाऱ्या अनेक फिल्म तयार होत असतात. त्या पाहून देखील आपण आपल्या ज्ञानात भर पाडू शकतो. अर्थात सत्य आणि तथ्य सांगणाऱ्याच फिल्म्स निवडणे आवश्यक आहे.
- सोशल मीडियाचा सदुपयोग : आज आपण सहज तासंतास मोबाईलवर चॅटिंग करत असतो. सोशल मीडिया आज आयुष्याचा एक भाग झाला आहे. पण याच सोशल मीडियावर अनेक व्यासपीठे, पेज, संकेतस्थळे अशी आहेत जिथे सामान्य ज्ञानाचे धडे दिले जातात. काही पोस्टर, फोटो, व्हिडीओ यांच्या माध्यमातून मजकूर अधिक सोपा करून सांगितला जातो, तेव्हा अशा माहितीपर माध्यमांशी जोडले जाणे गरजेचे आहे.
- गप्पा.. पण वेगळ्या : कंटाळा आला की आपण कोणत्याही आवडत्या व्यक्तीची अगदी कितीही उशीर गप्पा मारत बसतो. त्याच ऐवजी आपल्याच क्षेत्रातील किंवा स्पर्धा परीक्षा देणाऱ्या एखाद्या मित्राशी जर दैनंदिन घडामोडी, दिनविशेष, महत्वाच्या घटना, देशभरात घडलेल्या गोष्टी, राजकारण, समाजकारण यावर चर्चा केली तर सामान्य ज्ञान वाढेलच शिवाय, विषय समजायला मदत होईल.
- स्वतःची परीक्षा घ्या : अनेक वृत्तपत्रे स्पर्धा परीक्षांशी निगडित प्रश्नमंजुषा, शब्दकोडे प्रसिद्ध करत असतात. अशी वृत्तपत्रे शोधून त्यातील प्रश्नमंजुषा सोडवली पाहिजे. त्यामुळे आपल्याला किती येते आणि अजून किती अभ्यास करण्याची गरज आहे हे समजते. याशिवाय आपण जे वाचतो, लिहितो, पाहतो या सगळ्याची एक उजळणी वही करणे गरजेचे आहे. जेवढे सामान्य ज्ञान आपल्याला दिवसभरात आकलन झाले आहे, त्याची नोंद दिवसाअखेरी एका नोंदवहीमध्ये करून ठेवावी.
- मासिक, त्रैमासिकांचे वाचन : सामान्य ज्ञानाचे धडे देण्यासाठी अनेक पुस्तके आहेत. परंतु काही प्रकाशने दर महिन्याला, किंवा तीन महिन्यांतून एकदा मासिक, त्रैमासिक प्रसिद्ध करत असतात. त्यामध्ये घडून गेलेल्या ताज्या घडोमोडी नमूद केलेल्या असतात. त्या पुस्तकांचे वाचन केल्यास चालू घडामोडीचा एकसंध आढावा मिळतो.

# अब्जाधीश बिन्नी बन्सलची यशोगाथा...



**यशाची व्याख्या प्रत्यकाची वेगळी असते पण जिद्द असेल तरच यश मिळते असे म्हणतात. अशाच एका व्यक्तीच्या जिद्दीची आणि यशाची ही कहाणी आहे. गूगलने नोकरी नाकारल्यानंतर त्याने अशी झेप घेतली की तो 'फ्लिपकार्ट' या जगप्रसिद्ध कंपनीचा मालक झाला.**

हल्ली एखादी नोकरी गेली, एखादी संधी हुकली की नैराश्यात जाणारे अनेक लोक आपण पाहतो. पण राखेतून फिनिक्स उडावा तशी जिद्द असेल तर माणूस काहीही करू शकतो. अशीच गोष्ट आहे बिन्नी बन्सल यांची. त्यांचे नाव कदाचित अनेकांना माहितही नसले पण एक नाव प्रत्येकाला माहित आहे ते म्हणजे 'फ्लिपकार्ट'.

भारतात चांद्यापासून बांद्यापर्यंत घरपोच वस्तू देणारी म्हणजेच इ कॉमर्स सेवा पुरवणारी ही एक नामवंत कंपनी. पण या कंपनीची सुरुवात कशी झाली, याचाही एक खास किस्सा आहे. फ्लिपकार्टचे मालक बिन्नी बन्सल यांची ही प्रेरणादायी यशोगाथा तुम्हालाही नक्कीच नवी दिशा देईल.



फ्लिपकार्टचे संस्थापक बिन्नी बन्सल आणि सचिन बन्सल यांनी मोठ्या कष्टाने ही कंपनी उभारली आहे. आज फ्लिपकार्टचा टर्न ओव्हर अब्जावधी रुपयांपर्यंत पोहोचला असला तरी त्याची सुरुवात अगदी शून्यातून झाली होती. एकेकाकी बिन्नी बन्सल यांना 'गूगल'ने नोकरी नाकारली होती, पण त्यांची जिद्दी अशी होती की पुढे बन्सल यांच्याकडेच लाखो कर्मचारी कामासाठी होते. बिन्नी बन्सल आणि सचिन बन्सल एक दोघेही एकमेकांचे कॉलेजपासूनचे मित्र आहेत. ते एकमेकांचे भाऊ आहेत असे अनेकांना वाटते, पण त्यांचे केवळ आडनाव एक आहे. त्या दोघांनीही इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (IIT), दिल्ली मधून इंजिनिअरिंगचे शिक्षण पूर्ण केले. ते आयआयटी दिल्लीच्या २००५ च्या बॅचचे विद्यार्थी होते. इथून उत्तीर्ण झाल्यानंतर बिन्नी याना जगप्रसिद्ध 'गूगल' सोबत काम करायचे होते. परंतु गुगलने बिन्नी यांना दोन वेळा नोकरी नाकारली. पण हार मानतील ते बिन्नी कसले. त्यांनी आणखी जोमाने कामाला सुरुवात केली आणि स्वतःची कंपनी सुरू केली. फ्लिपकार्टची सुरुवात ऑनलाइन बुकस्टोअर म्हणून झाली. बिन्नी आणि सचिन यांनी एकूण २ लाख ७१ हजार रुपये जमा केले आणि फ्लिपकार्टची स्थापना केली. सुरुवातीला त्यांनी २००७ मध्ये बंगळुरू येथे एका २ बीएचके फ्लॅटमधून आपल्या कंपनीची सुरुवात केली. त्यानंतर सचिनने फ्लिपकार्टचे सीईओ म्हणून काम सुरू केले तर बिन्नी यांनी ई-कॉमर्स वेबसाइटच्या सीओओ पदाची जबाबदारी स्वीकारली. २००७ मध्ये सुरू झालेल्या या कंपनीने २०१२ मध्ये १५० दशलक्ष डॉलरचा टप्पा पार केल्यानंतर फ्लिपकार्ट भारतातील दुसरी युनिकॉर्न कंपनी बनली. त्यानंतर 'वॉलमार्ट'ने कंपनीचे ७७ टक्क्यांहून अधिक शेअर्स ताब्यात घेतले आणि बिन्नी आणि सचिन या दोघांनीही फ्लिपकार्ट कंपनी सोडली. आज कंपनी सोडली असली तरीही ते अब्जाधीश आहेत. आजघडीला बिन्नी बन्सल यांची एकूण संपत्ती ११ हजार ४६७ कोटी रुपये आहे तर सचिन बन्सल यांची एकूण संपत्ती १० हजार ६४८ कोटी रुपये आहे.

## शॉर्ट न्यूज

### गावरान बियाण्यांतून साकारली लोकशाहीची रांगोळी

■ **अकोले :** तालुक्यातील देवगाव येथील ममताबाई व जिजाबाई भांगरे यांनी गावरान बियाण्यांचा वापर करत मतदार जागृतीसाठी अनोख्या रांगोळ्या साकारल्या आहेत. या रांगोळ्यांच्या माध्यमातून मतदानाचे महत्त्व अधोरेखित करणारे संदेश, मतदान यंत्र, निवडणूक आयोगाचे चिन्ह आणि मतदानाची तारीख यांचे देखणे चित्रण करण्यात आले आहे. या कल्पकतेतून, ग्रामीण महिलांना व नवमतदारांना मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### बदनामीकारक वक्तव्ये करण्यास कोर्टाचा मनाई आदेश

■ **कर्जत :** १७- खोटेनाटे आरोप व आत्मदहनच्या धमक्यांबद्दल बारामती ॲग्रो कंपनीने बारामती न्यायालयामध्ये १० कोटी रुपयांच्या अब्रू नुकसानीचा आणि संबंधित लोकांना बारामती ॲग्रो कंपनी व संचालक मंडळाविरुद्ध (आ. रोहित पवार) बदनामीकारक मजकूर तयार करणे आणि प्रसारित करणे याविरोधात मनाई मिळण्यासाठी दावा दाखल केला आहे. यामध्ये संपूर्ण दाखल कागदपत्रांचे, व्हिडीओ क्लिपचे, आत्मदहनाच्या धमक्याचे आणि न्यायालयीन निकालांचे अवलोकन केले असता विरोधकांचे सर्व आरोप हे राजकीयदृष्ट्या प्रेरित असल्याचे दिसून येत आहे.

### अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीची मागणी

■ **पारनेर :** पंचायत समिती अंतर्गत ग्रामपंचायतीमध्ये झालेल्या कामांच्या शासकीय कपातीत मोठ्या प्रमाणात अपहार झाला असल्याचा आरोप करुन तातडीने कामांची दप्तर तपासणी करण्याची मागणी अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीचे निवेदन संघटनेचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी जिल्हा परिषद व जिल्हाधिकारी कार्यालयास दिले. याप्रकरणी चौकशी करुन दोषींवर कारवाई न झाल्यास जिल्हा परिषद समोर आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

### धनगरवाडीत तरुणाला गावठी कट्ट्यासह पकडले

■ **जेऊर :** जवळील धनगरवाडी परीसरातुन गावठी पिस्तुल कटटा व जिवंत काडतुस जवळ बाळगणाऱ्या तरूणाला एमआयडीसी पोलिसांच्या पथकाने पकडले आहे. निलेश बाबासाहेब ससाणे असे या तरुणाचे नाव आहे. एमआयडीसीचे स. पो. नि. माणिक चौधरी यांना गोपनिय माहिती मिळाली की, धनगरवाडी परीसरात हनुमान मंदीराजवळ एक तरुण गावठी कट्टा व काडतुस जवळ बाळगत फिरत आहे. ही माहिती मिळताच त्यांनी एमआयडीसी पोलीस स्टेशनचे पथक तयार करुन माहिती मिळाली त्या ठिकाणी धाव घेतली. तेथे आरोपी निलेश ससाणे यास सापळा लावुन पकडले.

### निमगाव वाघात कर्नल रविंद्रन बिजॉय यांची भेट

■ **निमगाव वाघा :** (ता. नगर) येथील शहीद जवान गोरख नाना जाधव यांच्या स्मारकास एमआयसीएसचे कर्नल रविंद्रन बिजॉय यांनी भेट देऊन शहीद जवान जाधव यांच्या स्मृतीस अभिवादन केले. यावेळी एमआयसीएसचे कर्नल राम मोहेन, कर्नल मोहंमद रफीक, डोंगरे बहुद्देशीय संस्थेचे अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते नाना डोंगरे, नगरचे गाईड अमोल बास्कर, मेजर ओबेरॉय, कर्नल एम. के. सिंग, मच्छिंद्र जाधव, सेवानिवृत्त मेजर शिवाजी पुंड आदींसह युवक-युवती उपस्थित होते.

# जुन्या बस स्थानकाला भेट देत भारावले निवृत्त कर्मचारी

**बसस्थानकाला भेट देवून डोळ्यात साठविल्या जून्या आठवणी**



**नगर : प्रतिनिधी**

**शहरातील माळीवाडा (जुने) बस स्थानक पाडून नव्याने बांधले जात असताना, सेवानिवृत्त एसटी कर्मचाऱ्यांनी आपली कर्मभूमी असलेल्या माळीवाडा बस स्थानकाला भेट देऊन शेवटची आठवण आपल्या डोळ्यात साठवली. तर नव्याने उभारले जात असलेले बस स्थानक पुन्हा पाहण्यासाठी परमेश्वराकडे आयुष्याची मागणी केली. एकत्र जमलेल्या सेवानिवृत्त एसटी कर्मचाऱ्यांनी अनेक जुन्या गोष्टींनी उजाळा दिला.**

एसटी महामंडळाच्या माळीवाडा बस स्थानकच्या जुन्या इमारतीच्या वैभवाला निरोप देण्यासाठी जिल्ह्यातून सेवानिवृत्त एसटी कर्मचारी हजर होते. सन १९५५ मध्ये एसटी महामंडळाने मोठे बस स्थानक बांधले होते. त्याला ६९ वर्षे झाले. त्याची पडझड झाली असताना, कार्यालयाची जागा अपुरी पडत असताना महामंडळाकडून नवीन बस स्थानक बांधण्याचा निर्णय घेतला आहे. जुने बस स्थानकात अनेक एसटी कर्मचाऱ्यांनी आपली हयात घालवली. कोट्यावधी प्रवासी वाहतुकीचा इतिहास घडवला.

महाराष्ट्रात सर्व प्रथम एसटी महामंडळाची मुहुर्तमेढ याच बसस्थानकात रोवली गेली. यामुळे अनेकांचे भावनिक नाते या बसस्थानकाशी जुळले आहे. एसटी महामंडळाने भव्य स्वरुपात अद्यावत बस स्थानक उभारण्याचे काम सुरु केलेले असताना, जुने बस स्थानकाच्या इमारतीला शेवटचे निरोप देण्यासाठी वास्तूला भेट देण्याचे नियोजन करण्यात आले होते, अशी माहिती सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष बलभीम कुबडे यांनी दिली.

यावेळी सेवानिवृत्त कामगारांनी वास्तूला भेट देऊन, वास्तूच्या आठवणी डोळ्यात साठवले. या वास्तूशी अनेकांचे भावनिक नाते जुळले असताना, अनेकांच्या डोळ्यांच्या कडा पाणवल्या. यावेळी सर्वात वयोवृद्ध सेवानिवृत्त कर्मचारी अर्जुन बकरे, साहेबराव चौधरी, रावसाहेब चौधरी आणि सेवानिवृत्त संघटनेचे पदाधिकारी व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. जुन्या वास्तूला भेट देण्याच्या गंगाधर कोतकर यांच्या संकल्पनेने सर्व सेवानिवृत्त कर्मचारी जमले होते. नव्या वास्तूच्या उद्घाटनाला सर्व सेवानिवृत्त कर्मचारी यांनी उपस्थित राहण्याचा संकल्प केला.

# हास्य-विनोदाचा कल्ला करत 'श्री गणेशा'चा टिझर प्रदर्शित

**२० डिसेंबरला प्रेक्षकांच्या भेटीला चित्रपटात साकारली अनोखी केमिस्ट्री**

**मुंबई : प्रतिनिधी**




**मराठी चित्रपटसृष्टीत कायम विविध विषयांवर चित्रपट बनतात. या तुलनेत रोड मूव्हींची संख्या फार कमी आहे. याच कारणामुळे 'श्री गणेशाहा नातेसंबंधांतील धम्माल गंमती-जंमतीवर आधारलेला मराठी फॅमिली एन्टरटेनर रोड मूव्ही घोषणा झाल्यापासून चर्चेत आहे. या चित्रपटाचा टिझर  नुकताच प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. अल्पावधीतच हास्य-विनोदाचा कल्ला करणारा 'श्री गणेशा'चा टिझर प्रेक्षकांच्या चांगलाच पसंतीस उतरत आहे.**

'श्री गणेशा' धमाल रोड ट्रीपचा आणि 'श्री गणेशा' फॅमिली एंटरटेनमेंटचा' असे म्हणत एमएच-१२ सिने मीडियाने आऊट ऑफ द बॉक्स फिल्म्सच्या सहयोगाने प्रस्तुत केलेला 'श्री गणेशा' चित्रपटाचा टिझर रिलीज केला आहे. या चित्रपटाची निर्मिती संजय भोसले आणि कांचन भोसले यांनी केली असून, लाफ्टर आणि मॅडनेसचा डबल धमाका असलेल्या या चित्रपटाचे दिग्दर्शन मिलिंद कवडे यांनी केले आहे. रवि माणिक भोसले आणि महेश माणिक भोसले या चित्रपटाचे सहनिर्माते आहेत. चित्रपटाची कथा मिलिंद कवडे यांची असून, पटकथा संजय नवगिरे यांच्या साथीने लिहिली आहे. संवाद लेखन संजय नवगिरे यांनी केले आहे. सदानंद उर्फ टिकल्या आणि भाऊसाहेब पाटील यांच्या जोडीची अनोखी केमिस्ट्री या चित्रपटात पाहायला मिळणार आहे.

'श्री गणेशा होऊ दे रे होऊ दे' असे गाणेही टिझरमध्ये कानावर पडते, जे चित्रपटाबाबतची उत्सुकता आणखी वाढवते. या चित्रपटात मुख्य भूमिकेत झळकणाऱ्या प्रथमेश परब आणि शशांक शेंडे यांना दिग्दर्शक मिलिंद कवडे यांनी आजवर कधीही न दिसलेल्या रूपात सादर केले आहे. आजवर प्रथमेशने कायम लांब केसांच्या तरुणाची भूमिका साकारली आहे, पण यात त्याचे केस खूप छोटे करण्यात आले आहेत. याउलट कायम वाढलेल्या दाढी-मिशीत दिसणाऱ्या शशांक यांचा क्लीन शेव्ह लुक आहे. यात प्रथमेशसोबत मेघा शिंदेची जोडी जमली आहे. या सर्वांच्या सोबतीला संजय नार्वेकर आपल्या अनोख्या शैलीत धमाल करणार आहेत.

'श्री गणेशा'ची सिनेमॅटोग्राफी डीओपी हजरत शेख वली यांनी केली आहे. गीतकार जय अत्रे आणि मंदार चोळकर यांनी गीतरचना केली असून, त्यावर संगीतकार वरूण लिखते यांनी सुमधूर संगीतसाज चढवला आहे. पार्श्वसंगीत अभिनय जगताप यांनी दिले असून, संकलन गुरु पाटील यांनी केले आहे. कला दिग्दर्शन सुमित पाटील यांचे असून, नृत्य दिग्दर्शन राहुल ठोंबरे यांचे आहे. दिपक एस कुदळे (पाटील) या चित्रपटाचे कार्यकारी निर्माता असून सहदिग्दर्शन विनोद शिंदे यांनी केले आहे. हा चित्रपट २० डिसेंबर रोजी सर्वत्र प्रदर्शित होणार आहे.

# खुनाच्या गुन्ह्यातील आरोपी जेरबंद

**सापळा रचून आरोपींना अटक**



**नगर : प्रतिनिधी**

**एलसीबीच्या पोलिसांना माहिती देतो म्हणून खून करणारे ५ संशयित आरोपींना तोफखाना पोलिसांनी पुणे येथून ताब्यात घेतले. त्यांना न्यायालयात हजर केले असता शुक्रवार (ता. २२) पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. संतोष भैरवनाथ पवार (रा. मंगलगेट, अहिल्यानगर), रणजित एकनाथ साळुंके (रा. गजराज नगर, अहिल्यानगर), सचिन भीमराव पवार (ता. आष्टी, जि. बीड), सचिन सर्जेराव चव्हाण (अहिल्यानगर), प्रवीण सुभाष पवार (भिस्तबाग, अहिल्यानगर), असे ताब्यात घेतलेल्या आरोपींची नावे आहेत.**

मयत करण अर्जून साळुंके यांना २ नोव्हेंबर रोजी मारहाण झाली होती. त्यांना उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल केले होते. त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. याबाबत तोफखाना पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. तेव्हा पासून आरोपी फरार होते. याबाबत तोफखाना पोलीस ठाण्याचे निरीक्षक आनंद कोकरे यांना मिळालेल्या माहितीनुसार या गुन्ह्यातील आरोपी पुणे येथे असल्याचे समजले. त्यानुसार पथकाने आरोपींना ताब्यात घेतले.

## हद्दपारीतील सराईत गुन्हेगार जेरबंद
## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**नगर : प्रतिनिधी**



**आगामी विधानसभेच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासनाने कंबर कसली आहे. जिल्ह्यातून २ वर्षांकरिता हद्दपार केलेल्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले आहे.शुभम उर्फ शिवम उर्फ मडक्या मारूती धुमाळ, (रा. त्रिमुर्ती चौक, सारसनगर, अहिल्यानगर) असे ताब्यात घेतलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्या विरुद्ध भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांना मिळालेल्या माहितीनुसार शिवम धुमाळ हा हद्दपार असताना तो नगर शहरात वास्तव्यास आहे, अशी खात्रीशिर माहहती मिळाली. त्यानुसार पथकाने आरोपीस सापळा रचून मोठ्या शिताफीने ताब्यात घेतले.

# बारामतीमध्ये पुन्हा लोकसभेचा कित्ता की दादांना संधी?

**बारामती : प्रतिनिधी**




**राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वात हॉट सीट म्हणून बारामती विधानसभा मतदारसंघाकडे पाहिले जात आहे. या मतदारसंघात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विरोधात त्यांची पुतणे युगेंद्र पवार हे निवडणुकीच्या रिंगणात आहेत. मात्र आज मतदानाच्या दिवशी युगेंद्र पवार यांनी अजित पवार यांच्या निवासस्थानी जात आपल्या आजीचे आशीर्वाद घेतले. तर दुसरीकडे जय पवार यांनी देखील युगेंद्र पवार यांचे वडील आणि आपले काका श्रीनिवास पवार यांचे आशीर्वाद घेतले. त्यामुळे आता बारामती विधानसभा मतदारसंघात पुन्हा एकदा लोकसभेचा कित्ता गिरवला जाणार की दादांना संधी मिळणार? याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहेत.**

बारामती विधानसभा मतदारसंघात पवार विरुद्ध पवार असा सामना पाहायला मिळत आहे. लोकसभा निवडणुकीत देखील सुळे विरुद्ध पवार असा सामना झाला होता. शरद पवार यांच्या कन्या सुप्रिया सुळे यांनी या निवडणुकीत अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांचा पराभव केला. त्यानंतर आता विधानसभा निवडणुकीत पुन्हा एकदा पवार विरुद्ध पवार असा सामना पाहायला मिळत आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांना त्यांचेच पुतणे युगेंद्र पवार यांनी या निवडणुकीत आव्हान दिले आहे. त्यामुळे आता या निवडणुकीकडे राज्याचे लक्ष लागले आहे. मात्र या दरम्यान युगेंद्र पवार यांनी मतदानाच्या दिवशी सकाळी आपल्या आजींची भेट घेत त्यांचे आशीर्वाद घेतले.

इकडे युगेंद्र पवार हे आजींचे आशीर्वाद घेत असतानाच दुसरीकडे अजित पवार यांचा मुलगा जय पवार यांची आणि युगेंद्र पवार यांचे वडील श्रीनिवास पवार यांची अचानक भेट झाली. त्यावेळी जय पवार यांनी देखील श्रीनिवास पवार यांचे आशीर्वाद घेतले. त्यामुळे आता बारामती विधानसभा मतदारसंघात कोणाचा आशीर्वाद फळाला लागणार, याकडे मतदार संघाचे लक्ष लागले आहेत.

जय पवार यांनी व्यक्त केला मुख्यमंत्री पदाबाबत विश्वास अजित पवार हेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होतील, असा दावा अजित पवार यांचे सुपुत्र जय पवार यांनी केला आहे. आगामी निकालानंतर अजित पवार हे राज्यात किंग मेकर असतील. तसेच तेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असतील, असे जय पवार यांनी म्हटले आहे. बारामती विधानसभा मतदारसंघात मतदान केल्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला, यावेळी ते बोलत होते.

# शिर्डीत बोगस मतदान? विखेंच्या कॉलेजमध्ये शिकणाऱ्या धुळ्याच्या मुलीचे लोणीत मतदान

## प्रश्न विचारताच काढता पाय घेतला

**शिर्डी : प्रतिनिधी**

**शिर्डीतील लोणी येथे बोगस मतदान केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. धुळ्यातील एका तरुणीने लोणी येथे मतदान केल्याचे समोर आले आहे. ही तरुणी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वैद्यकीय महाविद्यालयात शिकत असल्याचे माहिती आहे. या तरुणीला ओळखपत्रासह इतर कागदपत्रांबद्दल विचारणा केली असता तिने मतदान केंद्रावरून काढता पाय घेतला.**




शिर्डी मतदारसंघाच्या काँग्रेसच्या उमेदवार प्रभावती घोगरे या सहकाऱ्यांसह लोणीतील मतदार केंद्रावर गेल्या होत्या. त्यावेळी त्यांनी तिथे एका तरुणीची विचारपूस केली. तुम्ही कुठल्या आहात असे विचारले असता तरुणीने पीएमसी असे उत्तर दिले. तिच्या उत्तरावर पीएमसी गावाचे नाही, असे घोगरे म्हटल्यानंतर तरुणीने लोणी असे उत्तर दिले. लोणी खुर्द की ब्रुदूक? असे प्रश्न घोगरेंच्या सहकाऱ्याने विचारल्याने तरुणी भांबावून गेली. त्यानंतर तुम्ही नेमक्या कुठच्या? असे घोगरेंनी विचारल्यानंतर, त्यावर धुळे असे उत्तर तरुणीने दिले. तुम्ही धुळ्याच्या आहात, तर मग इकडे मतदान कसे? इथे कॉलेजला आहे का? कोणत्या कॉलेजला? असे अनेक प्रश्न विचारल्याने तरुणी आणखीच गोंधळून गेली.

तुम्हाला तुमच्या कॉलेजचे नाव पण माहीत नाही का? असे विचारले असता तिने प्रवरा मेडिकल असे उत्तर दिले. तर तिचे नाव विचारल्यावर ती स्नेहा डुल्ला असे नाव सांगितले. तुम्हा सगळ्यांनी कार्ड आली ना? किती विद्यार्थी आहेत? तुमचे नाव इकडे आहे आणि धुळ्यात पण आहे का? असे प्रश्न तरुणीला विचारण्यात आले. ते ऐकताच तरुणीच्या चेहऱ्यावरचा रंग उडाला होता. तिने तिथून हळूच पळ काढला.

# जलसंधारणातून ग्रामविकासाचा चमत्कार

## अरुणाचल प्रदेशचे सचिव ताय काये यांचे मत



हिवरे बाजार : प्रतिनिधी

**जलसंधारणासह गावाचा लोकसहभागातून साचेबद्ध विकास करण्याची किमया नगर तालुक्यातील आदर्शगाव हिवरेबाजारने साधली. येथे झालेली कामे, पाहून हा ग्रामविकासाचा चमत्कार असल्याचे मत अरूणाचल प्रदेश राज्याचे सचिव तथा निवडणूक निरीक्षक ताय काये यांनी मांडले.**

१९७२ च्या दुष्काळानंतर हिवरेबाजार गावात ज्वारी व बाजरी ही मुख्य पीके बनली होती. पावसाचे प्रमाण २०० ते ४०० मिलीमीटर असूनही त्यावेळी स्थलांतराची वेळ यायची. परंतु, १९८९ नंतर हिवरे बाजार हे गाव एका वेगळ्या कार्यासाठी ओळखले जाऊ लागले. पद्मश्री पोपट पवार यांच्या प्रयत्नांमुळे, गावात ग्रामविकास आराखडा तयार झाला. जलसंधारणाचे नियोजन करून गावात पहिले पाणी आले. तर समपातळी चर खोदून, कुरण विकास झाला. रोजगार उपलब्धीकडे लक्ष दिले.

लोकसहभागाच्या आणि सामूहिक श्रमदानाच्या माध्यमातून जलसंधारणाचे कामे झाल्याने गावाला अनेक पुरस्कारांनी गौरवण्यात आले. हे गाव राज्यासह देशभरात ग्रामविकासाचे एक मोठे उदाहरण म्हणून पुढे आले आहे. यापार्श्वभूमीवर सिक्कीम येथील सचिवांनी ग्रामविकासाच्या कामांची पाहणी केली. ताय काये हे सध्या पारनेर विधानसभा मतदारसंघात निरीक्षक म्हणूनही काम पाहात आहेत.

याप्रसंगी ताय काये म्हणाले, हिवरे बाजारसारखी ग्रामविकासाची कामे देशातल्या प्रत्येक गावात व्हावा. या गावातील शेतकऱ्यांसह तळागाळातील प्रत्येक माणूस समृद्ध आहे. गावात एकता आणि समानता व मानवता आहे. प्रत्येकजण एकमेकांच्या सुखदुखात सहभागी होतात. कमी पाऊस पडूनही इथली भूमी जलसमृद्ध आहे. इथले डोंगर वृक्षसमृद्ध आहेत आणि इथली माणसे सामाजिक दृष्ट्या समृद्ध आहेत ते पाहून मला आनंद झाला असे त्यांनी व्यक्त केले. पद्मश्री पोपट पवार यांनी त्यांना ग्रामविकासाबाबत माहिती दिली.

# सुपा परिसरात दुपारपर्यंत शांततेत मतदान

## मतदान केंद्रावर रांगा | पोलिसांचा बंदोबस्त



सुपा : प्रतिनिधी

**पारनेर-नगर २२४ मतदार संघात किरकोळ एक दोन प्रकार वगळता सुपा परिसरात मतदान शांततेत पार पडले. सकाळी सात वाजता मतदानाला सुरुवात झाली, महिलांसह पुरुष मतदारांनी मतदान केंद्रावर रांगा लागल्या.**

मात्र मतदान प्रक्रिया अतिशय संथ गतीने सुरू असल्याने महिलांना दोन ते तीन तास ताटकळत उभे रहावे लागले.

दरम्यान सकाळी सात वाजल्यापासून मतदारांमध्ये उत्साह दिसून आला. शेतात कांदा मका, ज्वारी आदींची खुरपणी चालू असल्याने महिला वर्गाने सकाळी सकाळी मतदान करण्यास प्राधान्य दिले. परिसरात सुपा, हंगा, वाळवणे, रायतळे, अस्तगाव, पिंपरी गवळी, रांजणगाव मशीद, रूईछत्रपती, भोयरे गांगर्डा, कडूस, बाबुर्डी, पळवे खुर्द, पळवे बुद्रुक, जातेगाव, घाणेगाव, गटेवाडी, नारायणगव्हाण, वाडेगव्हाण, मुंगशी, म्हसणे सुलतानपूर आदी ठिकाणी दुपारपर्यंत किरकोळ प्रकार वगळता शांततेत मतदान सुरू होते.यादरम्यान प्रत्येक मतदान केंद्रावर कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# शिरुर विधानसभेसाठी मतदारांचा उत्साह !

■ दुपारपर्यंत अनेक ठिकाणी मतदान केंद्रांवर रांगा

■ तालुक्यात सर्वत्र मतदान प्रक्रिया शांततेत पार

शिरूर : प्रतिनिधी

**शिरुर- हवेली विधानसभा मतदारसंघात आज उत्साहाच्या वातावरणात मतदानप्रक्रिया पार पडली.अनेक मतदान केंद्रांवर दुपारपर्यंत रांगा लागल्याचे चित्र पहायला मिळाले. महाविकास आघाडी शिरूर हवेली विधानसभा मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अधिकृत उमेदवार अशोक रावसाहेब पवार यांनी पत्नी सुजाता पवार, मुलगी सायली पवार यांच्यासह वडगाव रासाई येथील मतदान केंद्रावर आपला मतदानाचा हक्क बजावला.**



मतदान केंद्रावर मतदारांच्या रांगा लावण्यासाठी स्वयंसेवकांची मदत घेण्यात आल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी राजापूरकर यांनी सांगितले. शिरुर व हवेली तालुक्यातील ४५७ मतदान केंद्रावर आज बुधवारी, दि. २० सकाळी ७ ते सायंकाळी ६ यावेळेत मतदान प्रक्रिया पार पडली. यातील शिरुर तालुक्यात २१३ केंद्र तर हवेली तालुक्यात २४४ केंद्र होते. मतदानासाठी २०१८ कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली होती. केंद्राध्यक्ष ५०६, मतदान अधिकारी एक, दोन व तीन ११२७, शिपाई ४५७ व राखीव कर्मचारी २०६ नियुक्ती करण्यात आली असल्याचे राजापूरकर यांनी सांगितले. मतदान केंद्राबाहेर व्होटर हेल्प डेस्क सुविधा करण्यात आली होती. सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी बाळासाहेब म्हस्के याबाबतची व्यवस्था पहात होते.

शिरुर व हवेली या दोन्ही मतदारसंघांत पोलीसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. केंद्र व राज्य राखीव पोलीस दलाच्या तुकड्यांचीही मदत घेण्यात आली होती. त्यामुळे मतदान प्रक्रियेत दरम्यान तालुक्यात कुठेही अनुचित प्रकार घडला नाही. सर्वत्र मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडली.

# ब्रम्हमूर्ती दुसाणे बाबा सप्ताहास गुरुवारपासुन प्रारंभ

## आयोजक भाऊसाहेब कोल्हे यांची माहिती

निघोज : प्रतिनिधी



**ब्रम्हमूर्ती रामदास बाबा दुसाणे यांच्या १९ व्या पुण्यस्मरण निमित्ताने निघोज येथे गुरुवार दि.२१ ते सोमवार दि.२५ अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून भाविकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन रामदास बाबा महाराज दुसाणे महाराज अखंड हरिनाम सप्ताहाचे समितीचे अध्यक्ष भाऊसाहेब कोल्हे यांनी केले आहे.**

पोपटकाका देशपांडे, कचरु महाराज वरखडे, पोपट महाराज तनपुरे, रामचंद्र महाराज सुपेकर आदींचे प्रवचन तसेच सोमवार दि.२५ रोजी सकाळी ९ ते ११ महेश महाराज खाटेकर यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. वारकरी शिक्षण संस्था, अनिल महाराज देशमुख अशोक महाराज साळवे आदी साथ करणार आहेत. श्रीराम भजनी मंडळ, रामवाडी व माळवाडी भजनी मंडळ भाकरेवाडी, शिरसुले भजनी मंडळ शिरसुले, श्रीराम भजनी मंडळ निघोज, बोदगेवाडी भजनी मंडळ आदींचे भजन जागर होणार आहे.

यावेळी चिनकाबाई कान्हू कोल्हे यांचे पुण्यस्मरण कार्यक्रम सोमवार दि.२५ रोजी होणार असून या निमित्ताने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.या अखंड हरिनाम सप्ताहात मोरवाडी, रसाळवाडी,शिववाडी, रामवाडी, पांढरकरवाडी, कुंडवस्ती, सुलाखेवस्ती, ढवणवाडी, माळवाडी, बोदगेवाडी, पठारवाडी, वाजेवाडी , चासकरवाडी, काळेवस्ती, शिरसुले, देवीभोयरे , वडगाव गुंड, जवळा, शिवडी, लामखडे - वरखडे वस्ती, गाडीलगाव, लाळगेमळा,भुकनवस्ती निघोज व पंचक्रोशीतील गणेशोत्सव मंडळ व समाजसेवी मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहाणार आहेत.

भाविकांनी या अखंड हरिनाम सप्ताहात होणाऱ्या ज्ञानदानाचा मोठ्या प्रमाणात लाभ घ्यावा असे आवाहन भाऊसाहेब कोल्हे यांनी तसेच अखंड हरिनाम सप्ताह समिती पदाधिकारी व सदस्य तसेच ग्रामस्थ यांनी केले आहे .


# चासकरवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

## काळभैरवनाथ जयंतीचे औचित्य | भाविकांचा मोठा प्रतिसाद | राजेंद्र वाळुंज यांची माहिती

निघोज : प्रतिनिधी

**काळभैरवनाथ जयंती निमित्त लोणीमावळा परिसरातील चासकरवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून होणाऱ्या किर्तनास भाविकांचा मोठा प्रतिसाद मिळत असल्याची माहिती अख़ंड हरिनाम सप्ताह समितीचे पदाधिकारी व ज्येष्ठ ग्रामस्थ राजेंद्र वाळुंज यांनी दिली आहे.**

कचरू महाराज वरखडे, निवृत्ती महाराज तनपुरे, वैजनाथ पडवळ, भानुदास रसाळ, लक्ष्मण बेर्डे, मावळे गुरुजी आदिंचे प्रवचन तसेच नवनाथ महाराज माशेरे, अक्षय महाराज उगले, यशवंत महाराज थोरात, कविराज महाराज झावरे, संतोष महाराज बढेकर, भास्कर महाराज भाईक आदींचे किर्तने होणार असून रविवार दि.२४ रोजी सकाळी दहा ते बारा यावेळेत पठारवाडी येथील युवा किर्तनकार श्रीहरी महाराज पवार यांचे काल्याचे किर्तन होणार आहे.



शिरापुर भजनी मंडळ, वडनेर खुर्द भजनी मंडळ, भैरवनाथ भजनी मंडळ पठारवाडी, मोरवाडी भजनी मंडळ, विठोबा रखुमाई भजनी मंडळ वडझिरे,चासकरवाडी भजनी मंडळ आदींचे भजन जागर होणार आहे. लोकसहभागातून होणाऱ्या या अखंड हरिनाम सप्ताहास ग्रामस्थ व पंचक्रोशीतील जनतेने मोठ्या प्रमाणात सहकार्य केले आहे.

या अखंड हरिनाम सप्ताहात होणाऱ्या ज्ञानदानाचा मोठ्या प्रमाणात लाभ घ्यावा असे आवाहन चासकरवाडी, लोणीमावळा, समस्त ग्रामस्थ तसेच पुणेकर मंडळ, मुंबईकर मंडळ व अखंड हरिनाम सप्ताह समीती, काळभैरवनाथ जयंती उत्सव समिती यांनी केले आहे.

# इरा इंटरनॅशनलमध्ये मतदान जनजागृती उपक्रम

## विद्यार्थ्यांनी घेतली मतदान प्रक्रिया समजावून



जवळा : प्रतिनिधी

**सर्वसामान्य जनतेचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी व शासन दरबारी अधिकार प्राप्त करून देण्यासाठी लोकशाही पद्धतीने निवड करण्याची व्यवस्था आपले संविधानाने केलेली.मतदानास जास्तीत जास्त नागरिकांनी मतदान करावे आसे आवाहन प्राचार्या सोनाली सालके यांनी केले.**

जवळा(ता.पारनेर) येथील शासनाच्या मतदान जनजागृती उपक्रमांतर्गत मतदान दिन साजरा करण्यात आला.विद्यार्थ्यांना मतदानाचे महत्त्व, प्रक्रिया,वयोगट,देश व राज्य पातळीवरील विविध पक्ष,पक्षप्रमुख त्यांची चिन्हे,निवडणूक आयोग,उमेदवारची कर्तव्य,पात्रता,सामाजिक भौगोलिक प्रश्न व विकास,सर्वसामान्य जनतेचे प्रश्न याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. त्यावेळी त्या बोलत होत्या.

यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ॲड.मनिषा सोमवंशी यांनी काम पाहीले. अभिलाषा शिंदे,उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी आर्यन गुंड,सानवी घोगरे,स्वरांजली वरखडे, सुरज श्री मंदिलकर,प्रगती मुळे,भक्ति मदगे, जानवी गाडीलकर,आदित्य पवार,श्रेयस वाव्हळ,आदित्य शेटे इत्यादी विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला.

### मतदानाची प्रक्रियाबाबत माहिती

कोणते पक्ष आहेत,त्यांची चिन्ह,उमेदवार आहे निवडणूक आयोगाची कार्य काय आहे मतदान प्रक्रिया प्रात्यक्षिक रित्या समजावून सांगितले . मतदाराची भूमिका काय आहे आपण मतदान करताना योग्य उमेदवाराची निवड करताना ती व्यक्ती विकासासाठी सक्षम आहे का हे पडताळणे याबाबत माहिती दिली

कुणाल परंडवाल
इयत्ता आठवी विद्यार्थी प्रतिनिधी.

# माईंचे कार्य खूप महान ! - पोपटराव पवार

## माईनगरीत बाल भवन आश्रम पायाभरणी शुभारंभ

सुपा : प्रतिनिधी

**''माईचे कार्य खूप महान आहे. त्यांच्या पश्चात माई परिवारातील सर्व सदस्य सातत्याने आणि प्रामाणिक पणे हे काम पुढे नेत आहेत. त्यांना शासकीय अनुदान नाही. त्यामुळे अनाथ बालकांना हक्कांचा निवारा, अन्न, वस्त्र, शिक्षण मिळावे. यासाठी समाज म्हणून आपल्या सर्वांनी शक्य ती फुल ना फुलाची पाकळी म्हणून मदत केली पाहिजे. माईचे कार्य पुढे अविरत सुरु राहणार असून त्यासाठी आपण सर्वांनी सहभागी व्हावे.'' असे आवाहन पद्मश्री पोपटराव पवार यांनी केले.**



अनाथांच्या माई पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून माईनगरी (बोऱ्हाडे मळा) शिरूर येथे शारदार्जुन व्हटकर बाल भवन माईनगरी आश्रमाचे पायाभरणी समारंभ गुरूवारी (ता.१४) रोजी पद्मश्री पोपटराव पवार(आदर्श सरपंच- हिवरे बाजार), श्री नानजी भाई ठक्कर (ठाणावाला, शिक्षणमहर्षी) यांच्या प्रमुख उपस्थिती संपन्न झाला. यावेळी ते बोलत होते.

या वेळी स्नेहालयाचे संस्थापक गरीश कुलकर्णी,मंचर येथील उद्योजक गोविंदशेठ खिलारी, शिरूर येथे उद्योजक मनसुख शेठ गुगळे, व्हिजन इंटरनॅशनल स्कूलचे अध्यक्ष विकासजी पोखरणा, ऊर्जा उद्योग समूहाचे अध्यक्ष प्रकाश शेठ कुतवळ, शिरूर येथील उद्योजक संतोष मोरे, संजय शिंदे, शिरूर ग्रामीणचे उपसरपंच बाबाजी आण्णा वर्पे, माजी सरपंच अरूण तात्या घावटे, जेष्ठ प्रत्रकार नितीन बारवकर, डॉ. परवेझ बागवान, वासुदेव व्हटकर साहेब, संभाजीनगर येथील उद्योजक नानासाहेब आगलावे, माई देशमुख, ममता सपकाळ, दिपक गायकवाड, विनय सपकाळ आदी मान्यवर व माई परिवारावर प्रेम करणारे शेकडो नागरिक उपस्थित होते. एचडीएफसी बँक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात रक्तदात्यांनी रक्तदान केले.

शिक्षणमहर्षी नानजीभाई ठक्कर म्हणाले, ''ईश्वर सर्व काही देत असतो. आपण फक्त घेण्याचे काम न करता, समाजाचे आपण काही तरी देणे लागतो. ही भावना नेहमी मनात ठेवली पाहिजे. व्हटकर परिवाराने माईच्या बालकांना हक्काचे घर मिळावे म्हणून कोट्यवधी रूपयांची जागा घेऊन दिली. त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे. अनाथ लेकरांच्या हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी विनय सपकाळ यांनी सुरू केलेली चळवळ शिरूर मध्ये माईनगरी च्या रूपाने साकारण्यासाठी तुम्ही आम्ही योगदान देण्याची वेळ आली आहे. शिरूरकर योगदान देऊन माईनगरी अनाथ लेकरांच्या हक्काचे घर लवकरच पूर्ण करतील.'' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक माईनगरी चे संचालक विनय सिंधूताई सपकाळ यांनी तर, सुत्रसंचालन रावसाहेब चक्रे यांनी केले. आभार ममता सिंधूताई सपकाळ यांनी मानले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी यश सपकाळ, संस्थेचे प्रकल्प व्यवस्थापक सचिन ढोरमले, मीनाक्षी लटांबळे,दिनेश लोखंडे, दत्तात्रय जाधव, आदी कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

### ''मी आई झाले,तुम्ही गणगोत व्हा''

समाजातील दानशूर व माई परिवारावर प्रेम करणाऱ्या असंख्य नागरिकांनी सहकार्य केल्याने, आदरणीय माईंचे हे महान कार्य पुढे सुरू असून त्याचा शेकडो अनाथ लेकरांना फायदा होत आहे. नागरिकांच्या प्रेमाच्या जोरावर शिरूर येथील अनाथ लेकरांच्या हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी माईनगरी शिरूर येथील शारदार्जुन व्हटकर बाल भवन माईनगरी आश्रमाची उभारणी करत आहोत. संस्थेला कोणतेही शासकीय अनुदान नाही. तुमच्या सर्वांच्या प्रेमाच्या जोरावर हे महान कार्य सुरू आहे. यासाठी समाजातील दानशूर व्यक्तींनी मदत करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी ''माईनगरी'' आश्रमाच्या उभारणीला मदत करावी.असे आवाहन माई नगरी चे संचालक विनय सिंधुताई सपकाळ यानी केले आहे. मदत करण्यासाठी ९०४९४७४५४४ नंबर वर संपर्क करावा. असे आवाहन संचालक विनय सिंधुताई सपकाळ यांनी केले आहे.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com

'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)

Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com